# Kavysammelan

सुप्रभात **संचार**



## मराठी तंत्रज्ञानाची भाषा झाली पाहिजे

### 'मसाप'च्यावतीने कविसंमेलन

संचार प्रतिनिधी

**सोलापूर, दि.२९ -** जागतिकीकरणाच्या वेगवान स्पर्धेत मराठी भाषा टिकून राहण्यासाठी ती विज्ञान-तंत्रज्ञानाची भाषा झाली पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त करत प्रत्येकाने दैनंदिन जीवनात मराठीचा वापर वाढवला पाहिजे, असे मत हिराचंद नेमचंद वाचनालयाचे प्रमुख कार्यवाह डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र साहित्य परिषद जुळे सोलापूर आणि शिवदारे महाविद्यालयातर्फे आयोजित मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी येळेगावकर बोलत होते. अध्यक्षस्थानी दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाचे विश्वस्त प्रा. भीमाशंकर शेटे होते. प्रारंभी मसाप जुळे सोलापूर शाखेचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. 'खुलुस' आणि 'झांबळ' या पुस्तकाचे लेखक समीर गायकवाड यांचा यावेळी विशेष सन्मान करण्यात आला. व्यासपीठावर प्राचार्य दत्तात्रय सुत्रावे, मसापच्या कार्याध्यक्षा सायली जोशी, ज्येष्ठ.कवी माधव पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. येळेगावकर यांनी पुढे बोलताना सोलापूरची साहित्य आणि कवी परंपरा सांगितली. विद्यार्थ्यांनी ही परंपरा समजून घेऊन कवी आणि साहित्यिक होण्यासाठी वाचन, चिंतन, सूक्ष्म सामाजिक निरीक्षण, शब्दांची आराधना करायला हवी असेही ते म्हणाले. गायकवाड यांनी युवकांना वाचन वाढवण्याचा सल्ला दिला. सभोवतालचे जीवन डोळसपणे अनुभवले पाहिजे आणि सोशल मीडियाचा वापर सावधपणे करणे अनिवार्य आहे, असेही सांगितले. ज्येष्ठ कवी पवार यांच्या अध्यक्षतेखाली निमंत्रितांचे कविसंमेलन झाले.

यामध्ये डॉ. विद्या देशपांडे, गिरीश दुनाखे, डॉ. क्षमा वळसंगकर, रामचंद्र धर्मसाले, प्रांजली मोहीकर, डॉ. दामोदर बनसोडे, महेश गिरीगोसावी, समर्थ दिंडोरे यांनी सहभागी होऊन कविता सादर केली. याप्रसंगी प्राचार्य डॉ. आर. वाय. पाटील, नागिनी नागशेट्टी, मसापचे उपाध्यक्ष श्रीकांत कुलकर्णी, कोषाध्यक्ष आनंद देशपांडे, मसापचे कार्यकारणी सदस्य प्रशांत जोशी, रोहिणी कुलकर्णी, ना.वा. दुमालदार आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शुभदा उपासे यांनी केले. आभार प्राचार्य डॉ. सुत्रावे यांनी मानले.



**महाराष्ट्र साहित्य परिषद जुळे सोलापूर आणि शिवदारे महाविद्यालयाच्यावतीने आयोजित मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी श्रीकांत येळेगावकर, भीमाशंकर शेटे, डॉ. विद्या देशपांडे आदी.**

## मसापच्यावतीने मराठी दिनानिमित्त कविसंमेलन

लोकमत न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** महाराष्ट्र साहित्य परिषद जुळे सोलापूर आणि शिवदारे महाविद्यालयाच्यावतीने आयोजित मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रम पार पडला. अध्यक्षस्थानी दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाचे विश्वस्त प्रा. भीमाशंकर शेटे होते. हिराचंद नेमचंद वाचनालयाचे प्रमुख कार्यवाह श्रीकांत येळेगावकर यांनी आपल्या भाषणात सोलापूरची साहित्य आणि कवी परंपरा सांगितली. ज्येष्ठ कवी माधव पवार यांच्या अध्यक्षतेखाली निमंत्रितांचे कविसंमेलन झाले. 'खुलुस' आणि 'झांबळ' या पुस्तकांचे लेखक समीर गायकवाड यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी डॉ. विद्या देशपांडे, गिरीश दुनाखे, डॉ. क्षमा वळसंगकर, रामचंद्र धर्मसाले, प्रांजली मोहीकर, डॉ. दामोदर बनसोडे, महेश गिरीगोसावी, समर्थ दिंडोरे यांनी कविता सादर केली. मसाप जुळे सोलापूर शाखेचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. व्यासपीठावर प्राचार्य दत्तात्रय सुत्रावे, कार्याध्यक्षा सायली जोशी, ज्येष्ठ कवी माधव पवार यांची उपस्थिती होती.

यावेळी फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. वाय. पाटील, नागिनी नागशेट्टी, श्रीकांत कुलकर्णी, आनंद देशपांडे, प्रशांत जोशी, रोहिणी कुलकर्णी, ना. वा. दुमालदार उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. शुभदा उपासे तर आभार प्राचार्य डॉ. दत्तात्रय सुत्रावे यांनी मानले.